# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

**बातमी नं. १**

जळगाव दि. १७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयातील एम.एस्सी. (सर्व विषय) आणि एम.एस्सी. / एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध विषयांसाठी केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सोमवार, दि. १५ ऑगस्ट पासून सुरू झाली असून त्याचे माहितीपत्रक (ब्राऊचर), ऑनलाईन माहिती व नोंदणी अर्ज विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या www.nmu.ac.in संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या करीता एम.एस्सी. (सर्व विषय) आणि एम.एस्सी. / एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा User ID/Password तयार करून Registration करावे. विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क रू.५००/- ऑनलाईन पेमेंट गेटवे द्वारे भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदणी अर्ज दि. १५ ऑगस्ट २०२२ ते २७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत भरता येतील. प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रानी ऑनलाईन भरलेल्या अर्जांचे ई-व्हेरीफिकेशन दि.२७ ऑगस्ट २०२२ पर्यंत करावे.

सदर केंद्रीय प्रवेश प्रकियेच्या ऑनलाईन दोन फेऱ्या (राऊंड) होतील. प्रवेश नोंदणी प्रक्रीया पूर्ण झाल्यावर, प्राथमिक गुणवत्ता यादी जाहीर होईल. त्यानंतर गुणवत्ता यादीवर काही आक्षेप असल्यास ते नोंदवता येतील. त्यानंतर अंतीम गुणवत्ता यादी जाहिर केली जाईल. प्रवेशासाठी पहिली, दुसरी, व तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर केले जाईल. स्पॉट ॲडमिशनसाठी विद्यार्थ्यांनी कळविलेल्या ठिकाणी व वेळेत हजर राहणे बंधनकारक आहे.

ई-व्हेरिफिकेशनसाठी ऑनलाईन भरलेले अर्ज विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्र (ARC) केंद्रावर अपलोड करावेत. प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्र पुढीलप्रमाणे:- ऑनलाईन परीक्षा केंद्र, गणितशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव, डॉ.जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव, भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ, धनाजी नाना चौधरी कला व विज्ञान महाविद्यालय, फैजपूर, महात्मा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा, राष्ट्रीय स.शि.प्र.मंडळाचे य.ना. चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चाळीसगाव, एस.एस.व्ही.पी.एस.चे कै.पां.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे, आर.सी.पटेल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिरपूर, सि.गो.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साक्री, जी.टी.पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदूरबार, पी.एस.जी.व्ही.पी.एस.कला, विज्ञान व

..2

वाणिज्य महाविद्यालय, शहादा, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नवापूर असे एकूण बारा केंद्र प्रवेश अर्ज स्विकृतीसाठी निश्चित करण्यात आलेले आहेत. एम.एस्सी./एम.ए.(भुगोल) या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) भेट देवून प्रवेशासंबंधीतची सविस्तर माहिती समजून घ्यावी, ऑनलाईन संदर्भात काही अडचण आल्यास दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७१५८ किंवा ई-मेल cap@nmu.ac.in यावर संपर्क साधावा. अशी माहिती ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीचे अध्यक्ष प्र-कुलगुरू मा.प्रा.एस.टी.इंगळे यांनी दिली आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेसाठी नवीन मतदार नोंदणीसाठी विद्यापीठाने मुदतवाढ दिली असून त्यासोबतच प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ शिक्षक आणि विभागप्रमुख गटाच्या मतदार नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

दि. १७ ऑगस्ट रोजी कुलगुरूंच्या आदेशान्वये निवडणूक विभाग प्रमुख तथा उपकुलसचिव डॉ. एस.आर. भादलीकर यांच्या स्वाक्षरीने कार्यालयीन आदेश जारी करण्यात आले आहेत. नोंदणीकृत पदवीधर गटासाठी नव्याने नाव नोंदणी करण्यासाठी आणि मतदार नोंदणीच्या नुतनीकरणासाठी यापुर्वी १७ ऑगस्ट पर्यंत मुदत देण्यात आली होती आता ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी १५ सप्टेंबर पर्यंत मुदत वाढवण्यात आली असून १९ सप्टेंबरला दु. ५ वाजेपर्यंत अर्ज स्वीकृती केंद्रावर हार्ड कॉपी जमा करण्याची अंतिम मुदत असेल तर दि. २१ सप्टेंबरला दु. ४ वाजेपर्यंत विद्यापीठात अर्ज जमा करण्याची मुदत राहील.

**अधिसभा प्राचार्य गट** करीता ऑनलाईन अर्ज भरण्यास १८ ऑगस्ट पर्यंत मुदत होती ती आता दि. २४ सप्टेंबर दु. ५ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे. अर्ज स्वीकृती केंद्रावर हार्डकॉपी जमा करण्याची अंतिम दि. २६ सप्टेंबर सायं. ५ वाजेपर्यंत आणि विद्यापीठात अर्ज माहिती जमा करण्याची अंतीम दि. २७ सप्टेंबर दु. ५ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**अधिसभेसाठी व्यवस्थापन प्रतिनिधी गटा**करीता ऑनलाईन अर्ज भरण्यास दि. १८ ऑगस्ट पर्यंत मुदत होती ती आता दि. १५ सप्टेंबर, दु. ५ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे. अर्ज स्वीकृती केंद्रावर हार्डकॉपी जमा करण्याची अंतिम दि. १९ सप्टेंबर, सायं. ५ वाजेपर्यंत आणि विद्यापीठात अर्ज माहिती जमा करण्याची अंतिम दि. २१ सप्टेंबर सायं. ५ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

..3

**अधिसभा व विद्यापरिषदेच्या अध्यापक गटासाठी** ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट पर्यंतची मुदत होती. ती आता वाढवून दि. २४ सप्टेंबर सायं. ५ वाजेपर्यंत करण्यात आली आहे. तर अर्ज स्वीकृती केंद्रावर हार्डकॉपी जमा करण्याची अंतिम दि.२६ सप्टेंबर, सायं. ५ वाजेपर्यंत आणि विद्यापीठात अर्ज माहिती जमा करण्याची अंतिम दि. २७ सप्टेंबर, सायं. ५ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**विद्यापीठ शिक्षक गटाच्या नोंदणीसाठी** ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ३० ऑगस्ट पर्यंतची मुदत होती. ती आता वाढवून दि. २४ सप्टेंबर सायं. ५ वाजेपर्यंत करण्यात आली आहे. तर अर्ज स्वीकृती केंद्रावर हार्डकॉपी जमा करण्याची अंतिम दि.२६ सप्टेंबर, सायं. ५ वाजेपर्यंत आणि विद्यापीठात अर्ज माहिती जमा करण्याची अंतिम दि. २७ सप्टेंबर, सायं. ५ वाजेपर्यंत राहील.

**विभागप्रमुख गटा**करीता ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ०५ सप्टेंबर पर्यंतची मुदत होती. ती आता वाढवून दि. २४ सप्टेंबर, सायं. ५ वाजेपर्यंत देण्यात आली आहे. अर्ज स्वीकृती केंद्रावर हार्डकॉपी जमा करण्याची अंतिम दि.२६ सप्टेंबर, सायं. ५ वाजेपर्यंत आणि विद्यापीठात अर्ज जमा करण्याची अंतिम दि. २७ सप्टेंबर सायं. ५ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तरी सर्व संबंधित घटकांनी या मुदतवाढ दिनांकांची नोंद घ्यावी असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आली आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दि. १७ ऑगस्ट, २०२२

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी